## प्रतिवादी चा दि. १९-०२-२०२४ रोजीच्या मुद्दे पुर्ननिश्चीतीचे अर्जावरील आदेश..

आय.डी.बी.आय. बँक - वादी

विरुध्द

नवाज गौस शेख - प्रतिवादी

१ प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीतर्फे जादा मुद्दा काढणेसाठी दिला आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार प्रतिवादी यांचे कैफियतीमधील कथने पाहता वादीचा दावा मुदतीत नाही. कैफियत कलम १८ मध्ये वादीची मागणी मुदतीमध्ये नाही. असे कथन केले आहे त्यामुळे प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे मुदतीचा ज्यादा मुद्दा काढणे आवश्यक आहे.

२ सदरच्या अर्जावर वादीने दि. ११/०३/२०२४ रोजी म्हणणे दिले व अर्जातील कथन अमान्य केले आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे सदर दाव्यामध्ये जादा मुद्दा काढणेची गरज नाही. प्रतिवादीने खोडसाळपणाने, दाव्यास विलंब लागावा यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. वादीचे म्हणणे नुसार वादी बँकेने सदर कामातील प्रतिवादी यांना दि. २०/०८/२०१८ रोजी र.रु २,३०,०००/– चे कर्ज खात्यावर वर्ग केले होते (कर्ज दिले होते.) सदरचे कर्ज थकीत झाल्यामुळे (NPA) झाल्यामुळे वादी बँकेने प्रतिवादी यांना दि. १६/०७/२०१९ रोजी कर्ज वसुली नोटीस पाठविली होती. सदरची नोटीस मिळाल्यानंतर प्रतिवादी यांनी वादी

बँकेमध्ये येवून थकीत कर्जाची रक्कम भरतो असे सांगुन वादी बँकेकडून एक महिन्याची मुदत मागुन घेवून गेले होते परंतू यातील प्रतिवादी यांनी कर्जाची रक्कम मुदतीत भरली नाही, म्हणून वादीने बँकेने योग्य ती कायदेशीर कारवाई त्यांचेविरुध्द केली होती. त्यानंतरही सदर कामातील प्रतिवादी यांनी दि. ०८/१२/२०२२ रोजी र.रु. ३३९२.५०/– वादी बँकेत आणुन भरले होते. त्यामुळे प्रस्तुतचा दावा मुदतीत आहे.

३ दोन्ही पक्षकारांतर्फे विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.प्रस्तुतचा दावा हा रक्कम वसुलीसाठी दाखल केला आहे. प्रतिवादीनी आपल्या कैफियतीमध्ये दावा हा मुदतीमध्ये नसलेबाबत हरकत स्पष्टपणे घेतलेली आहे. वादीने नि. १ वरील दाव्यास कारण (Cause of Action) चा पॅरा क्र. ८ पहिला असता वादीने दाव्यात नमुद केलेले कारण हे वादी बँकेने प्रतिवादीस दि. २०/०८/२०१८ रोजी कर्ज मंजूर केल्यानंतर प्रतिवादीने आवश्यक कागदपत्रे वादी बँकेला लिहून दिल्यानंतर घडले होते. दाव्याचे स्वरुप,वादीची मागणी व प्रतिवादीनी कैफियतीमध्ये घेतलेल्या हरकती याबाबत मुद्दे काढणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादीने घेतलेली हरकत ही अत्यावश्यक आहे. मुदतीबाबत मुद्दा न काढल्यांस दोन्ही पक्षकारांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. तसेच दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यास अडथळा होणार आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. वादीतर्फे हरकत घेतली आहे की, सी.पी.सी. आदेश १४ अन्वये प्रतिवादींना असा अर्ज करता येणार

नाही. सी.पी.सी. आदेश १४ कडे पक्षकारांनी अर्ज करणेबाबत तरतूद नाही परंतू असा अर्ज पक्षकार करु शकत नाहीत अशीही तरतूद नाही. त्यामुळे अर्ज मंजूर केल्याने दोन्ही पक्षकारांचे नुकसान होणार नाही. दावा गुणदोषावर निकाली होणेस मदत होणार आहे. सदरचा मुद्दा गुणदोषांवर निकाली होणार आहे. त्यामुळे वादीस योग्य ती संधी मिळणार आहे. त्यामुळे वादीवर अन्याय होणार नाही. सबब खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. ई–फाईलला दि. ०६/०२/२०२४ रोजी काढलेल्या मुद्यामध्ये ज्यादा मुद्दा '1A – Whether suit is within limitation? असा काढण्यात येतो.

३. वादीने सदर मुद्दाबाबत ज्यादा पुरावा द्यावयाचा असल्यांस पुढील तारखेस दयावा.

(खुल्या न्यायालयात जाहीर)

ONKAR SANJAY SHASTRI
Digitally signed by ONKAR SANJAY SHASTRI
Date: 2024.03.11 18:32:39 +0530

सांगली.
दिनांक – ११/०३/२०२४.

( श्री. ओ. एस. शास्त्री )
११ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
सांगली.